स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत सानेगुरुजी संस्कार केंद्र व ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा महोत्सवाचे आयोजन १७ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आले आहे.

या महोत्सवात १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता दि.बा. मोकाशी लिखीत "वारींचे" सादरीकरण होईल. १८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता कवी अरुण कोल्हाटकरांच्या कवितेवर आधारीत भिजकी वही चे सादरीकरण करण्यात येणार आहे. १९ ऑक्टोबर रोजी जगाला प्रेम शिकविणाऱ्या माणसाची गोष्ट या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. हे सर्व कार्यक्रम विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात परिवर्तन ग्रुपचे कलावंत सादर करणार असल्याची माहिती प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे व ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी